# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे 411 005

क्र. पुविमं/शाखा क/आवेदन/~~5303~~ 5887
पुणे– 411005
दि. – 05 /11/2024

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/विद्यालय,
जिल्हा– पुणे, अहमदनगर, सोलापूर.

विषय– मार्च 2025 मध्ये घेण्यात येणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इ.10 वी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या नियमित तारखांना मुदतवाढ व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.
संदर्भ– जावक क्रमांक रां.मं./परीक्षा–3/4346 दि. 04/11/2024 चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च,2025 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate)प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी(Private Candidate) ,तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणा–या ,ITI ( औद्यागिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी ) चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाची मुदत दिनांक 05/11/2024 रोजी संपत असून त्यांच्या मुदतवाढीच्या व विलंब शुल्काच्या तारखांचे प्रकटन संदर्भ क्र. 1 नुसार प्रसिध्द करण्यात आले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यामधील सूचनानुसार निर्धारित मुदतीत आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्यात यावीत व त्यासंबंधीची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिवाकरिता,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005

प्रत माहितीसाठी तथा कार्यवाहीस्तव
1. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
2. शिक्षणाधिकारी, पुणे, अहमदनगर, सोलापूर
3. लेखाधिकारी पुणे विभागीय मंडळ,पुणे

173 prakatan

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य / महत्वाचे

क्र. रा.मं./परीक्षा–३/ ४२४६
पुणे – ४११००४
दिनांक – ०४/११/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्याच्या नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढीबाबत व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.

संदर्भ – १.रा.मं./ले–पे०६/परीक्षाशुल्क २०२४–२५/१७८८, दि.३०/०४/२०२४ चे पत्र.
२.क्र.रा.मं./परीक्षा–३/३८८३,दि.०३/१०/२०२४ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे **Saral Database** वरुन ऑनलाईन पध्दतीने त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

तसेच पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे त्यांचे शाळा प्रमुखांमार्फत प्रचलित पध्दतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने दि.०५/११/२०२४ पर्यंत भरावयाची होती. सदर नियमित शुल्काच्या तारखांना मुदतवाढ, विलंब शुल्काच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे –

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क RTGS द्वारे भरणा करणे व RTGS / NEFT पावती / चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट विभागीय मंडळाकडे जमा करावयाची तारीख |
|---|---|---|
| नियमित शुल्क (मुदतवाढ) | बुधवार, दिनांक ०६/११/२०२४ ते मंगळवार, दिनांक १९ /११/२०२४ | बुधवार दि.०४/१२/२०२४ |
| विलंब शुल्क | बुधवार, दिनांक २०/११/२०२४ ते शनिवार, दिनांक ३०/११/२०२४ | |

सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे भरण्यापूर्वी School Profile मध्ये शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरुन मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांच्या लॉगिन (School Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल. माध्यमिक शाळांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार

पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत मुख्याध्यापक यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

इ. १० वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळेमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे –

१ माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी Saral Database मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे व सदर Saral Database वरुनच नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.

२ पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) यांची माहिती Saral Database मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने निश्चित केलेल्या तारखांना ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहेत.

३ कौशल्य सेतू अभियानाचे Transfer of Credit मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर Transfer of Credit ची नोंद करावी. याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांनी प्रचलित पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची हार्ड कॉपी (Hard Copy) विभागीय मंडळात जमा करावी.

४ सर्व माध्यमिक शाळांनी Website द्वारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून RTGS/NEFT द्वारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा व चलनाची प्रत व Pre-list विहित मुदतीमध्ये विभागीय मंडळास जमा करावी. **रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामध्ये समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांच्या application status मध्ये " Draft" to "Send to Board" व Payment status मध्ये "Not Paid" to "Paid" असा बदल आला आहे का याची खातरजमा करावी.** अशा "Send to Board" व "Paid" Status प्राप्त झालेली आवेदनपत्रे मंडळास प्राप्त झाले असे गृहीत धरुन त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. व उर्वरित आवेदनपत्रे Draft Mode मध्येच राहतील व त्याबाबत कोणतीही कार्यवाही होणार नाही.

५ यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India/ HDFC Bank/Axis Bank च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरूपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

६ माध्यमिक शाळांना भरलेल्या आवेदनपत्रांमधून निवड करून एक किंवा एकापेक्षा अधिक चलने तयार करता येतील. परंतु शुल्काचा भरणा करताना प्रत्येक चलन स्वतंत्रपणे भरण्यात यावे. जेणेकरून त्यात समाविष्ट विद्यार्थ्यांचे Status Update होईल.

७ आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करून चलनावरील virtual account मध्ये RTGS/NEFT द्वारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी RTGS/NEFT द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच account number व IFSC code चूकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

८ माध्यमिक शाळांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

९ विलंब शुल्काने आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

१० अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

( देविदास कुलाळ )
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –

१ व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.
२ समन्वयक ऑनलाईन विभाग, राज्यमंडळ, पुणे.
३ लेखाधिकारी, राज्य मंडळ, पुणे.
४ अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे.
५ रोखपाल, लेखा शाखा, राज्य मंडळ व सर्व विभागीय मंडळे.

E:\Pardeshi1\Avedanpatra\FebMar25\SSC.docx15